वर्ष पंधरावे : अंक ०३ : मार्च २०२६





**जनजागृतीसाठी**
**रन-इन-सिन्क मॅरेथॉन**
कॉक्लिआ पुणे, संस्थेचा सहभाग

# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA

**शिवजयंती**
दौंड केंद्र



Volume Fifteen : Issue 03 : MARCH 2026 Total Pages : 20 Rs. 10/-



# शिवजयंती






शिवजयंती निमित्त
**राजा दिनकर केळकर संग्रहालयास**
उरवडे व स्वरनाद
कोथरुड केंद्र
यांची व्हिजीट

दौंड केंद्र



COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

वर्ष : १५ वे | अंक : ०३

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
नेहा नाटेकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे

## अंतरंग

**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**Diverse Paces.. One Finish Line** ... ०३
- Pallavi Sharma

**केळकर संग्रहालयाची भेट** ... ०४
- अर्चना कुलकर्णी

**NCED च्या दिवसांमध्ये पालकांनी शाळा चालवली-एक अविस्मरणीय अनुभव** ... ०५
- रूपाली उंद्रे

**Saksham and RSS Programme** ... ०६
- Bhagyashree Sanvastarkar

**निहिराची प्रगतीपथावर वाटचाल** ... ०७
- स्नेहल माळी

**When Time, Belief and Biology Converge** ... ०९
- Dr Geetanjali Takale

**आनंदक्षण...** ... ११
**कविता खरे,** मुख्याध्यापिका आणि
**तृप्ती कोहिनकर,** CSR Co-ordinator

**एक शैक्षणिक भेट...** ... १३
- मीनाक्षी वाघ

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

Awards, awareness programs and visit to various places, all this only in the second day of 1st February 2026. Yes a very busy month, no doubt.

A feather in our cap, Swaranaad received the 'Creative Art Therapy Award' at the hands of Dr Sancheti on 3rd Feb. Trupti Kohinkar has given a writeup on the same.

BSI had organized a meet of 12 NGOs in the school 'Anandakshan' which means happy moment. There were NGOs from Maharashtra as well as West Bengal and Gujarat also. All were connected with BSI, Building Schools in India. The interaction with other NGOs was very helpful. Ours was the only NGO working for Divyanga.

A camp was organized on 8th Feb to spread awareness as well as possibility of early detection.

After the international Grand tour cycle race event in Pune, this event organised by Adventures beyond Barriers on 14th Feb was no less exciting. This was a marathon where there were no barriers between the people with and without disabilities. Pallavi Sharma has given a very enthusiastic write up on the event as she, some of our staff and some past students of Swaranaad participated in the run.

The children from our Moraya and YCM centers were taken for a trip to the Dinosaur park on 12th Feb. Here the children not only enjoyed playing on the huge dinosaurs, but impressed the principal of a school, who had come there with her school children. She was very happy to meet and talk to them.

Children from Swaranaad were taken to the Fire station on 13th Feb to show how it works as well as to increase their vocabulary with new words. They were also taken to the Kelkar Museum on 18th Feb. As Shivajayanti was on the next day, the children were excited to see the swords and ammunition used in those days. They were also introduced to many antique items with respect to clothing, musical instruments, cooking gadjets, furniture, jewellery and glass and silver items.

Please enjoy Photos of all the above events in this issue to get a glimpse of the fun the kids and our staff had in the various programs.

These programs go a long way to make our hearing impaired children SPEAK.

Thanks to the full Cochlea team for commitment to child-centred, inclusive, and experience-based programs that truly make a difference.

◆◆◆

# DIVERSE PACES.... ONE FINISH LINE

**Pallavi Sharma**
P.R.O, Cochlea Pune for Hearing and Speech

The dawn of 14th February 2026, at 5:30 am started with the moon still in the morning twilight. The sports ground was inundated with participants swaying to the amazing Zumba steps and the warm up exercises before India's largest inclusive run- Run In Sync 2.0 which was organized by Adventure Beyond Barriers Foundation, supported by Bajaj Finserv, partnering with different NGOs of PwD, at Savitribai Phule Pune University which was to flag off going that morning. The sports ground was a sea of participants all donning the same attire,which was sponsored by the event management team. Everyone definitely looked IN SYNCH!

This was the second edition on a larger scale event following a world record aiming to break down barriers between people with and without disabilities. A very heart touching initiative implemented.

This event drew together not only organizations namely Forbes Marshall and iTeach Schools to promote a more accessible and inclusive society but in addition withover 7,000 participants which included 2,000 odd number of people with different disabilities (PwD). We saw 21 categories and 5,000 plus able-bodied runners who had joined in to promote "DISABILTY INCLUSION" through 3k, 5k and 10k marathon.

We, from Swaranaad,a few of our team members and ex-students got to witness and be a part of this event which focused on championing equality, togetherness, inclusion in action, where we all ran, walked and some participants used the wheel chair along side one another with the help of their respective caregivers who had volunteered to give these differently abled people a feeling of unity.

This electrifying atmosphere of over 7000 runners of all abilities, diverse religions, different genders and ages, came together on one track moving side by side towards the same Finish Line, became more than just a run. It culminated in depicting a celebration of resilience and communal harmony by creating a level playing field for all participants.

It paved a path to show case the true spirit of inclusion and proved that sport belongs to everyone.This started out as a powerful idea which turned into a movement that broke down the walls and barriers beyond disability and gave a new face to sportsmanship.

On the personal front, this marathon for me was not only a feat achieved on my own, by my two feet to get to the Finish Line, but it was a celebration of showing up, being a cheer leader, and caring for these differently abled wonderful human beings who do deserve inclusion in our society.

◆◆◆

## केळकर संग्रहालयाची भेट

**अर्चना कुलकर्णी**
स्पिच थेरपिस्ट, स्वरनाद कोथरुड केंद्र

१८ फेब्रुवारी २०२६ या दिवशी स्वरनादमधील सर्व विद्यार्थ्यांना घेऊन राजा दिनकर केळकर संग्रहालयाला भेट देण्यास घेऊन गेलो. केळकर संग्रहालयाला भेट देण्याचे प्रयोजन हेच होते की दुसऱ्या दिवशी शिवाजी महाराजांची जयंती होती. त्यानिमित्ताने स्वरनादमधील सर्व विद्यार्थ्यांना पुरातन काळातील शस्त्र, भांडी, वस्त्र व दागिने यांचे ज्ञान व्हावे त्याचबरोबर संग्रहालयात काय असते, संग्रहालयामध्ये काय काय ठेवले जाते याबद्दल माहिती कळावी.

संग्रहालयात गेल्यावर सर्वात प्रथम मुलांना लाकडी दरवाजे, खिडक्यांवरील कोरीव काम कसं असते, लाकडामध्ये छोटे पुतळे होते ते दाखवण्यात आले. हे कशाचे बनवले आहेत याचीही माहिती देण्यात आली. ती माहिती देत असताना प्रत्येक शिक्षिकेने त्यांच्या वर्गातील मुलांना एकत्र उभं करून त्याबद्दल माहिती दिली. संग्रहालयात पुढे पुढे जात असताना संग्रहालयामध्ये असलेल्या पुरातन वस्तू मुलांना दाखवण्यात आल्या. त्यामध्ये चांदीचे दागिने, हस्तिदंतावर केलेले कोरीव काम, कंगवे, पेटारे, तिजोऱ्या, कपाटे, जुन्या काळाची ताक करायची साहित्य, आरसे, भांडी हे सर्व पहिल्या दालनामध्ये मुलांना दाखवून त्याबद्दल मुलांना शिक्षकांनी माहिती दिली.

त्यानंतर दुसऱ्या दालनामध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या बाहुल्या, रुमाल, तसेच मुर्त्या, टांगा ठेवलेले होते. त्याबद्दलही मुलांना सांगण्यात आले. त्याच ठिकाणी तलवारी, दांडपट्टे, कट्यार, खंजीर, ढाली हे मुलांना सांगताना मुलांना तलवार हे माहित आहे पण ह्या तलवारी आणि ढाल कशा वापरल्या जातात, त्याकाळी युद्धामध्ये या तलवारी वापरल्या जायच्या आणि अशा मोठ मोठ्या तलवारी आहेत हे मुलांना दाखवण्यात आले. त्याचबरोबर पूर्वीच्या काळी बंदुका, पिस्तूल कशा होत्या हेही मुलांना दाखवण्यात आले. त्याबद्दल मुलांना शब्दचिठ्ठ्या दाखवून त्याबद्दलची नावे ही मुलांना सांगण्यात आली. छोट्या छोट्या मुलांना त्यांना समजेल अशा भाषेमध्ये सांगण्यात आले व मोठ्या मुलांना जास्त सविस्तर त्याबद्दल माहिती देण्यात आली.

तिसऱ्या दालनात गेल्यानंतर त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे, अडकित्ते, पगड्या तसेच अंगारखे... खूप पूर्वीचे लोक हे कपडे घालत होते, असं सांगण्यात आलं. त्याचबरोबर केळकर संग्रहालयात मस्तानी महाल तयार केलेला असल्यामुळे महाल म्हणजे काय असते आणि तिथे काय काय ठेवलं जातं याबद्दल माहिती देण्यात आली. त्याचबरोबर समयांचे विविध प्रकार, भांड्यांचे विविध प्रकार असे अनेक प्रकारच्या पुरातन वस्तूंची माहिती मुलांना शब्दचिठ्ठ्या दाखवून नावे सांगून देण्यात आली.

सर्व मुलांना ह्या जुन्याकाळच्या वस्तू बघून माहितीतर मिळाली त्याचबरोबर त्यांना आज काहीतरी नवीन बघीतल्याचा आनंदही झाला.

◆◆◆

## NCED च्या दिवसांमध्ये पालकांनी शाळा चालवली, त्याबद्दल आलेला एक अविस्मरणीय अनुभव

**रूपाली उंद्रे**
पालक – स्वरनाद कोथरुड केंद्र

NCED च्या दिवसांमध्ये जेव्हा शाळा नेहमीप्रमाणे सुरू राहू शकली नाही, तेव्हा पालकांवरच शिक्षकांची जबाबदारी आली. या काळात आमच्यासारख्या पालकांसाठी शाळा म्हणजे फक्त शिक्षण देणारी जागा नव्हती, तर ती आमच्या जबाबदारीची आणि संयमाची परीक्षा घेणारी जागा बनली होती.

सुरूवातीला शाळेत मुलांना शिकवताना मनात भीती होती. आपल्याला जमेल का? मुलांचे नुकसान तर होणार नाही ना? असे अनेक प्रश्न मनात येत होते. पण मुलांच्या शिक्षणासाठी काहीतरी करायलाच हवं या भावनेने आम्ही सगळे पालक एकत्र आलो. कोणी वर्गात बसून मुलांना शिकवले तर कोणी शाळेची स्वच्छता पाहिली.

आम्हाला शिक्षक असण्याचा अनुभव नव्हता. पण पालक म्हणून मुलांबद्दल असलेली काळजी आणि प्रेम हेच आमचे मोठे बळ होते. त्या काळात शाळा म्हणजे घरासारखी वाटत होती. पालक एकमेकांना मदत करत होते. या अनुभवांमुळे आम्हाला शिक्षकांचे महत्त्व खूप चांगल्या प्रकारे समजले. NCED च्या दिवसांमध्ये आमच्यासारख्या पालाकांना स्वतः शाळा चालवण्याची संधी मिळाली. हा अनुभव आयुष्यात कधीही न विसरण्यासारखा होता. रोज आपल्या मुलांना शाळेत पाठवताना शिक्षक किती मेहनत घेतात, हे आम्हाला प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. फक्त शिकवणे एवढेच नाही तर प्रत्येक मुलाकडे लक्ष देणे, त्यांची काळजी घेणे, त्यांना समजून घेणे किती महत्वाचे असते, हे त्या दिवसांत प्रकर्षाने जाणवले.

सकाळी वेळेत शाळा सुरू करणे, मुलांना रांगेत उभे करणे, प्रार्थना घेणे, वर्गात शांतता ठेवणे, अभ्यास समजावून सांगणे. हे सगळं करताना शिक्षकांचे खरे कष्ट कळले. प्रत्येक मुलाशी वेगळ्या पद्धतीने वागावे लागते हे आम्हाला शिकायला मिळाले.

शाळा घेताना सुरूवातीला थोडी भिती वाटत होती. आपण नीट शिकवू का? मुले ऐकतील का? पण हळु हळु आत्मविश्वास वाढला. मुलांनीही आम्हाला खूप सहकार्य केले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मन अगदी भरून यायचे. या अनुभवामुळे शिक्षकांबद्दल मनात प्रचंड आदर निर्माण झाला. रोज त्या इतक्या संयमाने, प्रेमाने, आणि जबाबदारीने आपली मुले घडवत असतात, हे समजले. आम्हाला पालक म्हणूनही आपल्या मुलांच्या शिक्षणात अधिक सहभागी व्हावे, त्यांना घरीही शिकवताना संयम ठेवावा हे शिकायला मिळाले.

NCED चे हे दिवस फक्त एक उपक्रम नव्हता. तर पालकांसाठी एक शिकवण होती. या अनुभवामुळे शाळा म्हणजे फक्त इमारत नाही, तर ती एक संस्काराची जागा आहे हे उमगले. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी सगळे मिळूनच शिक्षणाची वाट चालत असतात. हे आम्हाला या दिवसात अनुभवायला मिळाले.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की या दिवसांमध्ये पालक म्हणून शाळा चालवण्याचा अनुभव आमच्यासाठी एक अमुल्य शिकवण ठरली. हा अनुभव केवळ काही दिवसांचा नव्हता, तर आयुष्यभर उपयोगी पडणारा होता. शिक्षकांविषयीचा आदर अधिक वाढला. मुलांबद्दलची समज वाढली आणि शिक्षणाचे खरे महत्व कळले.

हा अनुभव आमच्या मनात कायम जिवंत राहिल.

◆◆◆

## Saksham and RSS Programme

**Bhagyashree Sanvastarkar**

Admin, Pusalkar Swaranaad Niwasi Kendra, Urawade

On 22nd Feb 26 got an opportunity to attend 'Divyang Rajyastariye Parishad' Organised by Samsrushti Kshamta Vikas evam Anusandhan Mandal, Nagpur (Saksham) and Rashtriya Swayamsevak Sangh Jankalyan samiti.

A programme was arranged at "Sewa Bhavan",Patwardhan Bage chowk,Gulawani Maharaj Road, Erandawane, Pune.

40 organizations registered for this program. Anchoring was done by Dr.Preeti Pohekar.

On stage there were -

Hon. Ayukta Hon. Chandrashekar ji    Hon. Rajanji GorheHon Mr.Ashok zaweri.
Hon. Dr. Wachasunder    Hon. Mr. Suresh Patil.

A program started with Sangha Geet & was followed by speeches of Hon.members.

Their guiding speech was very inspiring and encouraging. There were 2 sessions of An introduction of the Organizations through PPT.The representatives were called on stage to introduce themselves- talk about their work, the achievements,and problems they face while running the organization.Many organisations are doing a great job for Mentally disabled people. Like hostel for 18yrs and above People, skill development activities,An interactive session on -

- How can all organizations work hand in hand..
- How to do improve Government involvement
- How Early Intervention can be done more efficiently and effectively.
- Preventing measurements (Such As Pregnancy Test, Immunizations etc.)
- Importance of Research
- An attribution ceremony conducted by Hon. Dr. Upendra Kulkarni By conducting rashtriya Swayamsevak Sangh Prarthana.

◆◆◆

## निहिराची प्रगतीपथावर वाटचाल

**स्नेहल माळी**
पालक – पुसाळकर स्वरनाद निवासी केंद्र, उरवडे

नमस्ते, मी स्नेहल माळी माझी मुलगी निहीरा निखील माळी. तिला ऐकण्याचा प्रॉब्लेम असल्यामुळे तिची शस्त्रक्रिया (Choclear Implant) केली. 29 May 2025 ला शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली, तेव्हा ती अडीच वर्षांची होती. आता साडे तीन वर्षांची आहे. ऑपरेशन झाल्यानंतर वाचा–भाषा प्रशिक्षण चालू होती. शस्त्रक्रियेनंतर ती मोजके शब्द बोलायची. बाबा, पप्पा, टाटा, दादा एवढेच ठरलेले शब्द ती बोलत होती. नवीन शब्द शिकण्याचा प्रयत्नच करायची नाही. खूप हट्टी, सतत चिडचिड. सगळं स्वतःच्या मनाचच खरं करायची कोणाच ऐकायची नाही. अशी ही निहीरा. तिचे प्रशिक्षण घ्यायला लागलं की ती तोंडावर हात ठेवायची बोलायचा खूप कंटाळा करत होती. सहा महिने असचं चालेल. त्यानंतर आम्हाला या शाळे विषयी समजलं. पुसाळकर स्वरनाद उरवडे (पुणे) ही शाळा आम्ही बघायला आलो शाळा आम्हाला खूप आवडली शाळेमधले व तेथील परिसरातले वातावरण छान होते. शाळेतली मुलं बघीतली. इतकं छान बोलत होती, सगळी खूपच छान! त्यानंतर आम्ही दि. १२ नोव्हेंबर २०२५ या दिवशी प्रवेश घेतला. शाळेचा आमचा हा पहिला दिवस. सुरुवातीला मला पण जड गेलं पण नंतर काहीच वाटलं नाही. शाळा खूप आवडायला लागली.

शाळेमध्ये आल्यानंतर सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट निहीरा शिकली ती म्हणजे श्रवणयंत्र कानाला ठेवणे. घरी होती तेव्हा पूर्ण दिवसात एक तास ही ती श्रवणयंत्र कानाला ठेवत नव्हती. सारखी काढून फेकून द्यायची, तोंडात घालायची आणि इथे आल्यानंतर ती मशिन काढायची विसरूनच गेली. पूर्ण वेळ कानाला ठेवते, ती झोपल्यानंतरच मी तिचे श्रवणयंत्र काढते. ती पुर्ण वेळ श्रवणयंत्र कानाला लावून ठेवते हीच खूप मोठी गोष्ट होती आमच्यासाठी.

जेवणाची पण फार तक्रार असायची आणि आता स्वतःच्या हाताने जेवते, जेवण झाल्यावर तिच संपलेले ताट ती सर्वांना दाखवते. ते बघून सगळे खूप कौतूक करतात. शू आली तरी सांगयचं समजत नव्हतं, आता शू आली की लगेच सांगते. मुलांमध्ये मिसळते. दोन महिन्यातच तिाी खूप प्रगती झाली. हट्टीपणा कमी झाला आहे. आता तिला तिच नाव समजलंय, निहीरा कोण आहे? असं म्हणलं की ती तिचा हात वर करते आणि मी.. असं म्हणते. वेगवेगळे शब्द बोलायचा प्रयत्न करते.

इथे होणारे वेगवेगळे उपक्रम तिला खूप आवडतात. त्यातून पण ती खूप काही शिकते. नवनवीन उच्चार काढतेय. प्राणी, पक्षी, फुले, भाज्या, फळे असे बरंच काय–काय ती ओळखायला लागली. तिच्यातला हा बदल आम्हाला अनपेक्षितच होता. माझ्या घरच्यांनी तर तिच्यातला एवढा बदल पाहून आश्चर्यचकित झाले आणि खूप खूश झाले.

शाळेमध्ये खूप छान पद्धतीने शिकवले जाते. म्हणजे प्रत्येक आठवड्यामध्ये वेगवेगळी थिम असते. त्यानुसार शिकवले जाते. फळांची, फुलांची, भाज्यांची, कपड्यांची असे वगेवेगळे विषय अनुसरून थिम असतात. त्यातुन मुले शिकतात. असेच जेव्हा प्राणी यांची थिम चालू होते तेव्हा मुलांना प्राणी दाखवायाला घेऊन जायचं होते, एका दिवसाची सहल. सहल घेऊन जायचे ठिकाण कात्रज झू पार्क, पुणे, तिथे मुलांना वेगवेगळे प्राणी बघायला नेणार होते. निहीरा अशी एकटी कधीच राहिली नव्हती. मी ताईंना म्हणलं तिला नका नेऊ, ती राहणार नाही. तुम्हाला त्रास देईल, माझी पण इच्छा नव्हती तिला पाठवायची. पण ताईं म्हणाल्या पाठव तिला, तिला आवडेल. बघूया काय करतीयं. आपल्याला समजेल ती राहते का? ताईं तिला घेऊन गेल्या आणि विशेष म्हणजे तिने एव्हढी छान ट्रिप एन्जॉय केली. खूप छान राहिली. काही त्रास दिला नाही. पहिल्यांदाच ती अशी दिवसभर एकटी राहिली होती.

त्यानंतर अजुन एक ट्रिप झाली भंडारा डोंगर, देहू येथे या ट्रिपला तिला पाठवताना मला काहीच वाटलं नाही, ती पण तिने छान ट्रिप एन्जॉय केली.

अशी निहीरामध्ये हळू हळू प्रगती होत चालली आहे.

◆◆◆

## अग्निशामक दल भेट

**रुक्मिणी बाठे**
शिक्षिका, स्वरनाद कोथरूड केंद्र

१३ फेब्रुवरी २०२६, शुक्रवार या दिवशी आमच्या संस्थेने अग्निशामक दलाची विशेष भेट आयोजित केली होती. आठवड्याच्या थीम नुसार मुलांना व्यवसाय भेट द्यायची होती. म्हणून आम्ही मुलांना अग्निशामक केंद्र, एरंडवणे येथे घेऊन गेलो. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना आग लागल्यास योग्य ती खबरदारी, सुरक्षिततेचे नियम आणि तात्काळ उपाययोजना याबद्दल प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता.

सर्वप्रथम मुलांना रांगेत उभे करून घेतले. सर्वात आधी तिथे उभी असलेली अग्निशामकची गाडी त्यांना दाखवली. १९५६ सालातील पहिली अग्निशामक दलाची गाडी त्यांनी शोरूम मध्ये ठेवली होती. सगळ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षिकांना अग्निशामकदलातील कर्मचाऱ्यांनी माहिती सांगितली. त्यानंतर त्यांनी पहिल्या मजल्यावर नेले. तिथे अग्निशामक यंत्र (Fire Extinguisher) आणि बाकीची सुरक्षततेची यंत्र/उपकरणे जसे की दोर, बूट, हेल्मेट, हत्यारे, गॉगल, कपडे यांची त्यांनी माहिती दिली व जुन्या काळातील फोनसुद्धा दाखवला. नंतर आम्ही खाली आलो व सगळेजण व्यवस्थित बसलो कारण अग्निशामक दलातील कर्मचारी आम्हाला प्रात्यक्षिक दाखवणार होते. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले की लहानशी आग कशी विझवावी आणि मोठ्या आगीच्याप्रसंगी त्वरित अग्निशामक दलाला कसे कळवावे, हे त्यांनी सविस्तर सांगितले. अश्याप्रकारे मुलांना अग्निशामक दलाची भेट झाली.

◆◆◆







डायनासोर पार्क व्हिजीट
आणि जनयागृती,
मोरया हॉस्पिटल

एरंडवणे अग्निशामक
केंद्राला भेट
स्वरनाद कोथरुड केंद्र













स्वरनाद कोथरुड
येथील विद्यार्थ्यांना
**विज्ञान प्रयोगाची ओळख**
करुन दिली...




**आनंदक्षण लर्निंग स्पेस** येथे आयोजित **BSI पार्टनर मीट मध्ये**
विविध संस्थांनी आपले कार्य सादर केले आणि सरांनी प्रेरणादायी कल्पना शेअर करुन
कार्यक्रमाला नवी दिशा दिली.




# पालक आणि DECSE कोर्सेचे विद्यार्थ्यांची झेप संस्थेला भेट













**ENT**
**EARLY DECTECTION CAMP**
**at**
**Sant Ramdas Swami**
**Prathamik Vidyalay**





## When Time, Belief and Biology Converge
## : A Child's Hearing Journey

**By Dr Geetanjali Takale**
Research Officer, Cochlea Pune

Not every delay in healthcare is caused by lack of access, affordability, or education. Some delays occur quietly at the intersection of belief systems, perceived hope, and missed biological windows.

At Cochlea Pune, we recently encountered a pediatric cochlear implant case that reflects a reality seen across India's health system.

The family was well educated, engaged, and attentive. Hearing loss was suspected early in the child's life. Antenatal history was normal, the child was born full term, neonatal and motor milestones were appropriate, and there were no obvious medical red flags. Early in life, the mother began sensing that something was not right with her child's hearing. However, uncertainty, fear, and concern about how the family would react led her to remain silent for a long time. Hearing loss was not formally detected until the child was nearly two years old. The child reached cochlear implant surgery after the most critical period of auditory brain development had already passed.

The delay was not due to negligence. It was shaped by faith-based and alternative treatment pathways, pursued with genuine hope. Over nearly one year, the family pursued multiple faith-based interventions, believing improvement would occur. Later, even after learning about cochlear implantation, they explored alternative treatments including ayurvedic therapies and chiropractic approache shoping for a non-surgical solution. During this time, the child remained in a state of auditory deprivation unseen, but neurologically profound.

Science tells us that the first three years of life (0–36 months) represent a non-negotiable period of auditory neuroplasticity. During this window, sound shapes neural pathways that underpin speech, language, and cognitive development.

Another significant clinical dimension in this case was consanguinity, a known risk factor for hereditary hearing loss. Despite this background, the time-sensitive nature of early intervention was not immediately recognized highlighting how genetic risk often remains under appreciated outside specialist settings.

When the family finally arrived at Cochlea Pune, cochlear implant surgery was performed smoothly and rehabilitation was initiated. Surgery can restore access to sound but it cannot restore lost time.

From a public health standpoint, this story reflects broader systemic gaps:

- Early suspicion does not always translate into early diagnosis.
- Education alone does not overcome belief-driven delays.
- The 0–3 year critical period remains poorly understood at the community level.
- Genetic risk factors such as consanguinity require stronger counselling pathways.

At Cochlea Pune, our role extends beyond surgery. We are committed to early detection, scientific counselling, ethical care, and long-term rehabilitation, ensuring that no child loses an irreplaceable developmental opportunity due to delay.Because early detection has value only when it leads to timely, informed action.

This child's journey reminds us that the true challenge in hearing care is not technologyit is timing, awareness, and translation of science into decisions.

At Cochlea Pune, we remain committed to bridging that gapso that no child loses an irreplaceable developmental opportunity.In hearing and speech development, time once lost cannot be recoveredonly mitigated.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## आनंदक्षण...

**कविता खरे,** मुख्याध्यापिका,
पुसाळकर स्वरनाद निवासी केंद्र, उरवडे आणि
**तृप्ती कोहिनकर,** CSR Co-ordinator
स्वरनाद कोथरुड केंद्र

८ फेब्रुवारी २०२६ रोजी BSI चा कार्यक्रम 'आनंदक्षण' शाळेत आयोजित करण्यात आला होता. शाळेचे नाव जसे सुंदर आहे, तशीच शाळाही अतिशय छान आहे. या कार्यक्रमाला सुमारे १२ संस्था सहभागी झाल्या होत्या, त्यापैकी आमची संस्थाही सहभागी होती.

या संस्था विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या होत्या. काही संस्था पुण्यातील होत्या, तरी काही पुण्याबाहेरील तसेच महाराष्ट्राबाहेरीलही होत्या. पश्चिम बंगाल आणि गुजरात येथील संस्थाही या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. या सर्व संस्था BSI च्या भागीदार संस्था आहेत.

BSI च्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश सर्व संस्थांना एकमेकांची ओळख व्हावी, एकमेकांचे काम समजावे आणि पुढे परस्पर सहकार्य कसे करता येईल यावर चर्चा व्हावी हा होता. अनेक संस्था आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे काम करत होत्या, तर काही संस्था आदिवासी भागातील मुलांसाठी कार्यरत होत्या.

या कार्यक्रमातून अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. विशेषतः शिक्षण आणि भाषा शिकवणे ही सोपी गोष्ट नाही हे जाणवले. शासनाने मोफत व सक्तीचे शिक्षण जाहीर केले असले तरी आदिवासी भागांमध्ये मुलांची बोलीभाषा मराठीपेक्षा खूप वेगळी असते. त्यामुळे सर्वसाधारण शाळांमधील शिक्षणपद्धती त्यांच्यासाठी नेहमीच योग्य ठरत नाही. तसेच त्यांच्या बोलीभाषेत शैक्षणिक साहित्य किंवा पुस्तकेही उपलब्ध नसतात. या पार्श्वभूमीवर काही संस्था मुलांच्या तसेच प्रौढांच्या शिक्षणासाठी विशेष काम करत आहेत आणि BSI त्यांना मदत करत आहेत. ही आमच्यासाठी नवीन आणि प्रेरणादायी माहिती होती.

या कार्यक्रमात आमच्या संस्थेचे प्रतिनिधित्व तृप्ती कोहिनकर आणि मी, कविता खरे यांनी केले. आम्ही उरवडे येथील निवासी केंद्राच्या कामाचे प्रेझेंटेशन सादर केले. दिव्यांग क्षेत्रात काम करणारी आमची एकमेव संस्था तिथे उपस्थित होती. कर्णबधिर मुलांना श्रवणयंत्रांच्या मदतीने ऐकायला आणि बोलायला शिकवणे शक्य आहे, ही माहिती अनेकांना नव्याने समजली. आमच्या प्रेझेंटशन आणि व्हिडिओमुळे संस्थेचे काम सर्वांना खूप आवडले.

या कार्यक्रमातून BSI चे नवीन सदस्य सौ. अश्विनी धर्माधिकारी व श्री. राहुल धर्माधिकारी तसेच ज्ञानप्रबोधिनी हराळी येथील श्री. अभिजीत कापरे सर यांची ओळख झाली. पुढे BSI India अंतर्गत एन.जी.ओ. नोंदणी करून विविध सामाजिक संस्थांच्या

क्षमता विकासासाठी (Capacity Building) आणि विविध प्रकारच्या मार्गदर्शनासाठी काम करण्याचे त्यांचे नियोजन आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. राजेंद्र लेले सर यांनी सर्व संस्थांना एक महत्त्वपूर्ण संदेश दिला. संस्थेचे काम व्यवस्थित चालण्यासाठी स्टँडर्ड ऑपरेटिंग सिस्टीम (SOP) तयार करणे आवश्यक आहे. मात्र ही प्रणाली तयार करताना बॉटम–अप अप्रोच वापरणे महत्त्वाचे आहे, म्हणजे प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तींच्या सहभागातून SOP तयार झाली पाहिजे. त्यामुळे संस्थेचे काम अधिक प्रभावी आणि सातत्यपूर्ण होऊ शकते.

आनंदक्षण शाळेतील महिला वर्गाने कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. जेवणाची व्यवस्था, कार्यक्रमाचे आयोजन तसेच शैक्षणिक साहित्य व उपक्रमांचे प्रदर्शन अतिशय सुंदर होते.

एकंदरीत हा कार्यक्रम वेगळा, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक अनुभव होता. या कार्यक्रमाचा भाग होता आला याचा आम्हाला खूप आनंद झाला.

◆◆◆

## डायनॉसॉर पार्क..

**स्मिता शेळके**
विशेष शिक्षिका, स्वरनाद चिंचवड केंद्र

पार्क म्हटले की मुले खूप खूश असतात. मुलांना तिथे खेळायला, बघायला वेगवेगळ्या गोष्टी असतात. त्यामुळे मुले खूप आनंदी असतात, त्यांना मजा येते. म्हणून आम्ही १२.२.२०२६ यादिवशी म्हणजे वाय.सी.एम. आणि मोरया सेंटर अशी एकत्र ट्रीप डायनॉसॉर पार्क, पिंपळे–गुरवला घेऊन गेलो. दुपारची वेळ असल्यामुळे मुलांना टोप्या घालूनच बोलावले होते. सगळ्यांची तिकिटे काढली, गेटवर तिकिटे देऊन आम्ही आत गेलो. मुलांना समोर भले मोठे डायनॉसॉरचे स्टॅच्यू दिसले की मुले ते बघून, बापरे! असे म्हणत आम्हाला दाखवत होते. पार्कमध्ये जागोजागी बसण्यासाठी वर छत टाकून झोपडीसारखे बनवले होते. त्या सावलीत मुलांना घेऊन एका ठिकाणी बसलो, छान वाटत होते. तिथेच मुलांना व पालकांना खाऊ देण्यात आला, आम्ही देखील घेतला. मुलांचे खाऊन होईपर्यंत आम्ही माहितीपत्रक वाटण्यासाठी आजूबाजूला गेलो. त्याच पार्कमध्ये २ शाळांच्या ट्रीप आल्या होत्या. वनिता समाज शाळा, पुणे या स्कूलच्या मुख्याध्यापिका त्यांना संस्थेची माहिती सांगितली. त्यांना आपल्या मुलांना भेटावेसे वाटले. त्या आपल्या मुलांसोबत शेकहॅण्ड करत बोलत होत्या. त्यांना मुलांना भेटून खूप छान वाटले. आपल्या संस्थेचे माहितीपत्रक त्यांना दिले. मुलांचा खाऊ खाऊन संपला. मग आम्ही खेळण्यांकडे गेलो. तिथे सी–सॉ, घसरगुंडी, झोका इत्यादी गोष्टी तसेच डायनासोरचे स्टॅच्यू, फुल–झाडे या गोष्टी शब्दचिठ्ठ्या दाखवून सांगितले. मुले बोलण्याचा प्रयत्न करत होती. पार्कमधून निघण्याची वेळ आली पण मुले काय तिथून बाहेर पडायला तयार नव्हती. कसेबसे त्यांना समजावून आम्ही आमची ट्रिप संपवली. मुलांनी छान मजा केली.

◆◆◆

## एक शैक्षणिक भेट...

**मीनाक्षी वाघ**
पालक प्रशिक्षण को–ऑर्डिनेटर

आपल्या कॉक्लिआ पुणे संचालित 'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र स्थापन झाले, त्या वर्षापासूनच आपल्या शाळेत पालकांसाठी भविष्यात त्यांच्या पाल्यांना घरी भाषा–वाचा श्रवण विकास कसा करावा या संदर्भात प्रशिक्षण दिले जाते. याच प्रशिक्षणाच्या साह्याने पालकांची मुले उच्चशिक्षित होवू लागली. जेव्हा पालक आपले कर्णबधिर मूल घेऊन येते, त्यावेळेस फक्त ते पालक आपल्या कर्णबधिरत्व पाल्याच्याच विचारात गुंतलेले असतात. हे एकच अपंगत्व आहे. असे त्यांना वाटत असते. मात्र ते दिसत असूनही इतर अपंगत्वाला ते बघतही नाहीत किंवा त्याचा विचारही करीत नाहीत.

याच विचारातून त्यांना दूर करण्यासाठी आपण आपल्या स्वरनादतर्फे शैक्षणिक भेटीचे आयोजन केले जाते. त्या पालकांना आपल्या कर्णबधिर बालकांप्रमाणे इतर अपंगत्व असलेली बालके या समाजात आहेत. किंबहुना जन्म घेतात. अशा बालकांना जवळून अनुभवणे, समजून घेणे याचेही ज्ञान असावे म्हणजे मीच अशी का? (केवळ कर्णबधिर मूल झाले म्हणून...) असे वाटते. त्यापेक्षाही अतिशय कष्टदायक क्लेशदायक व आयुष्यभर सांभाळाव्या लागणाऱ्या बालकांचेही आई–वडिल जे आपल्या मुलांचा सांभाळ करतात. हे समजावे म्हणून आपण दिव्यांग असलेल्या शाळेला भेटी देत असतो.

या वर्षीही आम्ही आपल्या पालकांना शैक्षणिक भेट देण्यासाठी पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने विशेष मुलांचे पुनर्वसन केंद्र, मासुळकर कॉलनी, पिंपरी, येथील 'झेप पुनर्वसन केंद्र' या संस्थेत गेलो होतो.

आमचे जवळ जवळ २८ पालक या संख्येने उपस्थित होते. यात स्वरनाद कोथरूड, स्वरनाद उरवडे तसेच DCESE (HI) प्रशिक्षण घेणारे विद्यार्थीही होते.

संस्थेत गेल्यावर संस्थेचे प्रमुख संस्थापक नेत्रा मॅडम आणि थेरपीस्ट रूपाली मॅडम यांनी खूपच सहकार्य केले. त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती दिली. तेथे शिकत असलेली मूले ही ७५ टक्के स्वमग्न (ऑटिस्टिक) व त्याबरोबर इतर अपंगत्व असलेली मूले होती. त्यांना स्पीच थेरपी देणे त्याच बरोबर शारीरिक व मानसिक उपचार कसे केले जातात हे दाखविले आणि त्यासाठी प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या रूमस् होत्या, त्याही दाखवण्यात आल्या

तसेच मुलांना व्यवसायाच्या माध्यमातून सहभागी करून त्यांच्यात कला–कौशल्य विकसित केले जाते. त्यासाठी फुलांच्या पाकळ्यांच्या माध्यमातून नैसर्गिक रंग

तयार करणे, त्याच्या क्षमतेनुसार विविध वस्तू तयार करणे, शिवून घेणे, जोडणे, चिटकवणे यांचे प्रशिक्षण देण्यात येते. ज्यामुळे त्यांची एकाग्रता, फाईन, मोटर स्किल विकसित केले जाते. त्यांचे सरावाने दृढीकरण करतात.

रूपाली मॅडम यांनी सर्व संस्था दाखविली. कशा पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते हे पालकांना सविस्तर सांगितले. पालकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. आमच्या सोबत को–ऑर्डिनेटर स्मृती मॅडमचाही सहभाग होता.

पालकांनाही एक आगळा वेगळा अनुभव आला. पालक प्रशिक्षणार्थी या संस्थेतून बाहेर पडल्यावर त्यांना असे विचार करणारे ज्ञान मिळाले. पालकांना हा एक आनंददायक अनुभव मिळाला. तसेच त्यांना समजले की, म्हणजे कोणतेही कारण असो... त्यावर उपाय असतोच.

खरंच असं म्हटले गेले आहे की... प्रयत्न केले तर परमेश्वराची ही साथ मिळते. म्हणूनच 'मूकं करोति वाचालं, पङ्गु लङ्घ येते गिरिम् '

◆◆◆

## श्रवण बाधित मुलांच्या पालकांची नावनोंदणी आणि जनजागृती

**अनुपमा ढमाळ**
सोशल वर्कर, स्वरनाद कोथरूड केंद्र

सामर्थ्य संस्था ही एक स्वयंसेवी संस्था असून ती ऑटिझम, बौद्धिक अपंगत्व, शिकण्यातील अडचणी तसेच विकासातील विलंब असलेल्या मुलांसोबत कार्य करते. दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेने दिव्यांग व्यक्तींशी संबंधित विविध संस्थांना एकत्रित आणून उपक्रम आयेजित केला होता. त्या उपक्रमात प्रत्येक संस्थेला स्वतंत्र माहितीपर स्टॉल देण्यात आला होता.

कॉक्लिआ संस्थेतून ५ कर्मचारी उपस्थित होते. स्टॉलच्या माध्यमातून संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच पालकांशी संवाद साधून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

उपक्रमादरम्यान एकूण १७ जणांनी स्टॉलला भेट दिली. त्यापैकी ४ श्रवणबाधित मुले होती. पालकांशी संवाद साधून मुलांची प्राथमिक माहिती नोंदविण्यात आली तसेच पुढील उपचार व सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्टॉलला भेट देण्याऱ्या प्रत्येक व्यक्तीस माहिती व माहितीपत्रक देऊन जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास पुणे येथील नोडल ऑफिसर व बालविकास प्रकल्प अधिकारी मनिषा बिरारिस मॅडम यांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. तसेच प्रतिनिधींकडून २० अंगणवाडी सेविकांना जनजागृतीपर माहिती देण्यात आली. असे एकूण ३७ लोकांपर्यंत संस्थेच्या कार्याची माहिती पोहचविण्यात आली.

◆◆◆

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - FEBRUARY 2026

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 355 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 66 |
| 3. | Aided Audiogram Testing | 20 |
| 4. | No. of Speech Assessment | 18 |
| 5. | No. of Counseling Sessions | 14 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 81 |
| 7. | No. of Students getting Individual OT | 44 |
| 8. | Group Occupational Therapy Sessions | 1 |
| 9. | Psychological Assessment | 0 |
| 10. | No. of Activity Therapy Session | 0 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - FEBRUARY 2026

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 0 |
| 2. | Narayangoan | 40 |
| 3. | YCM Pimpari | 60 |
| 4. | Morya Chinchwad | 54 |
| 5. | Phonda | 40 |
| 6. | Porvorim | 52 |
| 7. | Manchar | 68 |
| 8. | Daund | 15 |
| 9. | Urawade (Residential) | 44 |
| 10. | Kudal | 44 |

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे - ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी-चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव, पुणे ३३.
**फोन : ९८२२६७१८४० / ९५२१६०४६००**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान-नाक-घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी-गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा - ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व-प्राथमिक विद्यालय**
एफ-४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा - ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी-चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/९२८४८५०७५०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ९४२३०९३७८०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे - ४१२ ११५.
**फोन : ९८२२०९४९४०**



**सक्षम आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती आयोजित**

**राज्यस्तरीय दिव्यांग परिषदेत कॉक्लिआ पुणे संस्थेचा सहभाग**



**सामर्थ्य एन.जी.ओ. जनजागृती अभियान**



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015

Published and Posted on 10th MARCH, 2026
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.






स्वरनाद पुनर्वसन केंद्राचा
संचेती हेल्थकेअर अकॅडमी तर्फे
२०२६ सालच्या
**क्रिएटिव्ह आर्ट थेरपी**
पुरस्काराने गौरवीण्यात आले.

Address :
To,